# औषधी उपयोगासाठी वनस्पती

## १) शेवगा (हेगवा)

रोग– डोळे येणे व रात आंधळेपणावर
उपाय– शेवग्याच्या पाल्याचा रस २, ३ थेंब डोळ्यात घालणे रात्री झोपतेवेळी

रोग– विंचू दंश
उपाय– डिंक पिगळून लावणे

* पोटदुखी, नळ भरणे, पिसाळलेले जनावर दंश, लखवा, संधीवात

इतर उपयोग– शेवग्याच्या शेंगाची भाजी किंवा फुलाची किंवा पानांची भाजी खाणे. रक्त व शक्ती वाढते. शेंगा द्वारे उत्पन्न. उदा. १ शेंगला २५ ते ५० पैसे

## २) डाळिंब

रोग– मुलांचा हगवण
उपाय– डाळींबाची साल घासून दोन चमचा देणें

रोग– हूकवर्म जंत
उपाय– डाळींब झाडाची साल २ चमचा घेऊन काढा देणे

* छातीदुखी, तोंड कोरडे, रक्त प्रदर, खोकला, डोळ्यात उष्णता, नाकातून रक्त, वांती, चपटे जंत, ताप रक्त मुळव्याध

इतर उपयोग– फळाद्वारे उत्पन्न उदा. फळ १ किलोला रु. २५ ते ३०

## ३) गावठी आंबा

रोग– रक्त मुळव्याध व रक्तप्रदर
उपाय– एक चमच कोईचे चूर्ण तांदुळाच्या धुवणातून देणे

रोग– घामोळचा
उपाय– कच्चा आंबा भाजून त्याचा रस अंगास लावणे

* नाकातून रक्त, पायास भेगा, हगवण, खरुज, व इतर चामडी रोग, गोल जंत, जुना गर्मी, मुळव्याध

इतर उपयोग– फळाद्वारे उत्पन्न

## ४) सिताफळ

रोग- डोक्यातील उवा व लिखा
उपाय- सिताफळाच्या बिया बारीक वाटून रात्री डोक्यास लावणे. त्यावरुन फडके बांधणे. दुसऱ्या दिवशी सकाळी डोक्यावरुन आंघोळ करणे. परंतु ते पाणी डोळयात जाऊ नये याची काळजी घ्यावी. डोळयात गेल्यास अधू होतात

रोग- पिकलेला फोड-
उपाय- पाने बारीक वाटून त्यात थोडे सैंधव मीठ घालून लेप लावून कापड बांधणे, कृमी मरतात. कच्या फोडावर पोटीस बांधल्यास तो फोड लवकर पिकतो व त्यातील पु बाहेर पडतो.

* मुत्रघात, आवेच हगवण

इतर उपयोग- फळाद्वारे उत्पन्न

## ५) पेरु (जांब)

रोग- भांगेची नशा उतरणे
उपाय- चार पेरु खाणे व पानाचा रस एक चमच पिणे

रोग- हृदयाला ताकद येण्यासाठी
उपाय- अर्धवट पिकलेल्या पेरुचे तुकडे करुन वाफेवर शिजबावे व नंतर वाटून मीठ, मिरची, कोंथिंबीर घालून चटणी रोज खाणे

* पोटाचे विकार, खोकला कफ, दात व हिरडी दुखी, हगवण

इतर उत्पन्न- फळाद्वारे उत्पन्न

## ६) गावठी बोर

रोग- केसतोडा
उपाय- बोरीचा पाला वाटून बांधणे

रोग- उचकी
उपाय- मधले बी खाणे

* रक्त हगवण, लघवी थेंब-थेंब पडणे, गोवर, जखम, हिवताप
इतर उपयोग- जळण, शेती अवजारे, चारा कुंपण

## ७ ) मोहू

रोग– प्रदर रोग
उपाय– मोहाची साल कुटून पिण्यास घेणे १ कप सकाळ, संध्याकाळ ७ दिवस

रोग– गोवर
उपाय– १, २ चमच दारु पाजणे व सर्व अंगास लावणे

* गुरांचे रोग, हाड मोड, भूक न लागणे, संधिवात, पांडूरोग, ताप, अपचन

इतर उपयोग– फुल व तेल पोष्टिक

## ८) लिंबू

रोग– हगवण
उपाय– लिंबू रस पिण्यासाठी देणे

रोग– उलटी
उपाय– लिंबूचा पाला चाबून खाणे

* गोबर, कांजण्या, खोकला

इतर उपयोग– फळाद्वारे उत्पन्न

## ९) जांभूळ (होरी)

रोग– हगवण
उपाय– बिया दोन चमचा वाटून मधातून देणे

रोग– ओकारी
उपाय– झाडाची आंतर सालीची राख २ चमचा मधातून देणे

* घामोळी, मधुमेह, मुखरोग, रक्त प्रदर

इतर उपयोग– फळाद्वारे उत्पन्न

## १०) कवठ

रोग– पित्त
उपाय– कवठ पाला व रिठा पालाचा रस अंगास लावणे आणि कवठाची साल कुटून पिणे

रोग– पाण्यासारखा जुलाब होणे
उपाय– धायटी पाला, बोर पाला, कवठ पाला चटणी वाटून दुधातून देणें

* लालप्रदर, उचकी, भूक न लागणे अपचन, सर्पदंश, हिरडी टॉनिक

इतर उपयोग– घर बांधणे, फळाद्वारे उत्पन्न उदा. १ फळाला १ रु.

## ११) आवळा

रोग– मुलांची उंची वाढवण्यासाठी
उपाय– लहान मुलांना रोज आवळे खाण्यासाठी दिले तर मुलांची उंची वाढते शक्ती व रक्त वाढते व मुले निरोगी राहतात

रोग– छातीत आग किंवा आंबट ढेकर
उपाय– सुकलेले आवळे काळे होईपर्यंन्त भाजणे नंतर पावडर तयार कर वे ती अर्धा चमच पावडर झोपताना ७ दिवस देणे

गर्भवती स्त्रीस पाच आवळा दररोज दिले तर गर्भ चांगला वाढतो व त्या बाईला शक्ती व रक्त चांगली वाढते मुल चागले निरोगी राहते

* मधुमेह, वांती

इतर उपयोंग- फळाद्वारे उत्पन्न

## १२) बेहडा (बेडो)

रोग- कफाचा खोकला
उपाय- बेहडा फळाचे टरफल चुर्ण करुन १ ते २ चमच घेणे

रोग- मुतखडयावर
उपाय- फळाचे बा घासून मधातून घेणे

* डोळयात फुल, खाज, सुज, दारु नशा

## १३) हिरडा (इडो)

रोग- मुळव्याध
उपाय- सर्वप्रकारच्या मुळव्याधीवर हिरडा चुर्ण मिठा बरोबर घेणे

रोग- अजीर्ण
उपाय- हिरडा चुर्ण व सुंठ चुर्ण सारखे घेऊन गुळात मिसळून पाण्याबरोबर घेणे

* त्रिफळा चुर्ण (आवळा चुर्ण, बेहडा व हिरडा चुर्ण चे मिश्रण) ह्या रोगात वापरता येईल- जखम, केस गळणे, मुत्र रोग, डोळयाचा रोग, शरीरात आग (तळहात, तळपाय, पोट, डोळे) पोट साफ करणे

दात दुखीवर, अपचनमुळे पोट फुगणें व दुखणे, दमा खोकला, काळीज व प्लिहा रोग, किड पडल्यास, चबक, जखमेवर, डोळे येणे

## १४) वड

रोग- तोंडातून रक्त येणे
उपाय- वडाचा कोवळा पाला किंवा कोवळी पारंभी कुटून रस पिणे

रोग- प्रसुती लवकर होत नसल्यास
उपाय- स्त्रीच्या कमरेखाली वडाची पारंबी ठेवणे

* दात हलणे, जंत, वांती, उष्णता

## १५) खैर (काटी)

रोग- मासिक पाळीबरोबर येत नसल्यास
उपाय- खैर साळीचा काढा करुन १ कप रोज ७ दिवस घेणे

रोग- पायात भेगा होऊन आग होणे
उपाय- १ कप खैर अंतर साल व ४ कप पाणी उकळून घट्ट राहिल ते काढयानें भेगा भरणे

* चामडी रोग, सांधेदुखी, पांढरे डाग, शेतीवर खैरा

इतर उपयोग- इमारत, मुसळ

## १६) कडू लिंब

रोंग– खरुज
उपाय– कडूलिंबाचे पानें, करंज बी व थोडे मिठ हे एकत्र चटणी वाटून अंगाला लावणें. लावण्या अगोंदर चांगले घासून आंघोळ करणें

(ज्या घरात खरुज आहे. सर्वांनी एकत्र ईलाज केला पाहिजे नाही तर खरुज परत–परत होंणार)

रोंग– ताप
उपाय– लिंबाचे पानें वाटून रस काडून अंगास लावणें किंवा सालाचा काडा १/२ कप तिन वेळा पिणें

* डोंक्यात उवे, डोंक्यातील भुसा, अंगास खाज, काबीळ, पोंटात आग, चामडी रोंग

इतर उपयोंग– फळापासून तेल, साबण, पाने किटकनाशक, चारा घर बांधणें

## १७) करंज (कोंजी)

रोग– खरुज
उपाय– करंजाच्या बियाचे तेल खरजेस लावणे किंवा बी घासून लावणें

रोग– दात दुखीवर
उपाय– करंजाचे दातूण घासणे

* अशक्तपणा, डोळयात फुल, पोटदुखी, गजकरण, हिरडीतुन रक्तस्त्राव

इतर उपयोग– तेल, साबण

## १८) उंबर

रोग– गोवर
उपाय– मुळातील पाणी (चीक) पाजणे व अंगास लावणे

रोग– हगवण
उपाय– १/२ चमच उंबर चीक १ कप दही मध्ये पिणें

* गाल पावे, गर्मी, वांती, अशक्तपणा, बुद्धीवर्धक, गर्भपात, मधुमेह, जखम

१९) पिंपळ

रोग– गर्मीचे चट्टे
उपाय– पिंपळाच्या वाळलेल्या सालीची राख तुपात कालवून लावणे

रोंग– कावीळ
उपाय– साल कुटून पाण्यात रात्रभर ठेवून सकाळी पाणी पिणें ३ दिवस

* उचकी, वांती, खरुज, जखम, हगवण, प्रदर, खोंकला

२०) साग (हाग)

रोंग– मुतखडा
उपाय– सागाचे बी उगाळून किंवा कूटून ८ ते १० दिवस खावे

रोंग– जखम
उपाय– सागाचे तेल लावावे

* फुरशादंश, डोंळेसूज

इतर उपयोंग– इमारत, जळाऊ

२१) सावर (हावरी)

रोंग– प्रदर
उपाय– सावरीची साल कुटून पिणें आंणि फुलाची भाजी खाणें १ कप सकाळ संध्याकाळ

रोंग– मुरमे
उपाय– सावरीचे काटे बारीक वाटून त्यात दुध, हळद सारखे घेऊन गरम करुन लेप लावणें

* अशक्तपणां, धातुवृद्धी, हगवण

## २२) रिठा

रोग– कोणत्याही सर्प दंशावर
उपाय– रिठा फळ कुटून पाणी पाजणें

केस वाढविणें
उपाय– रिठा मधले मगज वाटून ७ दिवसातून एकदा रात्री चोळून लावणें
नंतर सकाळी रिठा फळाचे कवच साबण सारखे वापरुन केस धणें

- डोंक्यात भुरी, दमा

इतर उपयोंग– साबण

## २३) शिवण

रोंग– सुज
उपाय– शिवणची साल घासून लेप लावणें किंवा पाने गरम करुन बांधणें

रोंग– मुत्ररोंग
उपाय– फळाचा आणि पानाचा काढा करुन पिणें

- नाक किंवा तोंडातून रक्त, उन्हाळी डोंके दुखी, ताप, दुध वाढविणे
इतर उपयोंग– इमारत, डोंळ

टिप– ह्या रोंगांसाठी सुद्धा वापरता येईल.

ह्या विषयी सविस्तर माहिती खालील व्यक्ती कडून मिळेल.

तुकाराम पाडवी–लहान उमज
बस्तीराम नाईक–लोय
नामू कोकणी–बालअम्राई
जनसेवा मंडळ–नंदुरबार

वरील रोप खैराले, लहान उमज व लोय ह्या ठिकाणी मिळतील.